लोकमत पू. पान क्र.2

दि. 01/04/2023

# कांदळवनामुळे नुकसान झाल्याचे एकही प्रकरण नाही

## लक्षवेधीवर मुनगंटीवार यांचे स्पष्टीकरण



लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : कांदळवनात जमिनी गेलेल्या शेतकरी व मालकांचे नुकसानभरपाईचे एकही प्रकरण आलेले नाही तसेच अवकाळी पावसामुळे अथवा सोसाट्याच्या वाऱ्यामुळे शेताच्या काही भागांत बिया पसरून तेथे कांदळवनाची वाढ झाल्याचे निदर्शनास आले नसल्याचे स्पष्ट करून आमदार प्रताप सरनाईक यांनी उपस्थित केलेले काही मुद्दे मुनगंटीवार यांनी खोडून काढले.

आ. सरनाईक यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेद्वारे कांदळवनाबाबत मुद्दे उपस्थित केले होते. त्यावर वनमंत्र्यांनी सविस्तर म्हणणे मांडले. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर कांदळवन संरक्षण व संवर्धन केले जात आहे. अवकाळी पावसामुळे अथवा सोसाटयाच्या वाऱ्यामुळे शेताच्या काही भागात कांदळवनाच्या बिया पसरून त्या ठिकाणी कांदळवनाची फार मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने शेतकऱ्यांना शेती करताना अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आलेले नाही असे मुनगंटीवार यांनी स्पष्ट करून आ. सरनाईकांचा मुद्दा खोडून काढला..

घोडबंदर किल्ल्याशेजारी शिवसृष्टी उभारण्याच्या कामाचा प्रस्तावची तपासणी कांदळवन वनपरिक्षेत्र अधिकारी ठाणे यांच्या स्तरावर सुरू आहे. घोडबंदर खाडीकिनारा विकसित करण्याच्या अनुषंगाने ना हरकत प्रमाणपत्रासाठी पालिकेकडून प्रस्ताव मिळाला आहे. त्याचीही पडताळणीची सुरू आहे. तर मेट्रो-९ आणि दहिसर-भाईंदर कोस्टल रोडच्या कामाबाबतचे प्रकरण कांदळवन कक्षास मिळालेले नाही. जनहिताचे प्रकल्प वनजमिनीवर करण्यासाठी वन अधिनियमानुसार प्रस्ताव तयार करून केंद्राची परवानगी मिळवून, उच्च न्यायालयाची कांदळवन वृक्षतोडीबाबत परवानगी घेऊन कामे करता येतात. त्यामुळे जनहिताच्या कामांना अडचण नसल्याचे मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले आहे.



मीरा-भाईंदरच्या गृहनिर्माण संस्थांच्या उपनिबंधक कार्यालयात जाऊन अधिकाऱ्यांना खडसावताना प्रताप सरनाईक आणि गीता जैन.

# अधिकारी, कर्मचाऱ्यांना आमदारांनी खडसावले

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा-भाईंदरच्या गृहनिर्माण संस्थांच्या उपनिबंधक कार्यालयातील मनमानी कारभाराच्या वाढत्या तक्रारींनी संतप्त झालेले शहरातील दोन्ही आमदारांनी अचानक उपनिबंधक कार्यालयात पोहोचले. तेथे खासगी कर्मचारी काम करत होते. पैसे खाऊन चालवलेली मनमानी बंद करा, अन्यथा निलंबित करायला लावूच, पण पोलिस कोठडीत ही बसवल्या शिवाय राहणार नाही, असा दम संतप्त आमदारांनी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना भरला.

मीरा-भाईंदरच्या उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयाच्या भ्रष्ट आणि मनमानी कामकाजाबद्दल लोकांच्या तक्रारी आहेत. शुक्रवारी आमदार प्रताप सरनाईक व आमदार गीता जैन अचानक भाईंदर पश्चिमेतील उपनिबंधक कार्यालयात धडकले. कार्यालयात ३ ते ४ खासगी कर्मचारी काम करत असल्याचे पाहून चुकीचे निर्णय देऊन जो भ्रष्टाचार होतो त्या पैशातून खासगी कर्मचाऱ्यांचा पगार निघतो का? असा सवाल आमदारांनी उपनिबंधक सतीश देवकाते यांना केला.

### 'चुकीचे, नियमबाह्य निर्णय रद्द करा'

- अनेक सोसायट्यांबाबत चुकीचे व नियमबाह्य निर्णय दिले असतील तर रद्द करा. कार्यालयात दलालांना थारा देऊ नका, अशी समज ही देवकाते यांना दिली.
- आ. सरनाईकांचा पारा तर चांगलाच चढल्याचे पाहून देवकाते व कर्मचारी गांगरून गेल्याचे दिसले. त्यांच्यासोबत शिवसेना जिल्हाप्रमुख राजू भोईर, माजी नगरसेवक चंद्रकांत मोदी, रक्षा भूपतानी, रिटा शाह, सचिन मांजरेकर आदी होते.

आमदारांनी देवकाते यांना फैलावर घेतले. तुम्ही लोकांना न्याय देत नाहीत, भ्रष्टाचार करून व नियमांचे उल्लंघन करून निर्णय देतात. तुमचा व कर्मचाऱ्यांचा कारभार सुधारा. अन्यथा, तुम्हाला निलंबित करून केवळ घरी नाही. थेट पोलिसांच्या कोठडीत बसवू, असा दमदेखील आमदारांनी भरला.

लोकमत पान क्र.1

# डम्परने पायी चालणाऱ्या महिलेला चिरडले

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : तुळिंज रोडवर डम्परखाली आल्याने ३८ वर्षीय महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या अपघातानंतर डम्पर चालकाला पोलिसांनी अटक केली आहे. याप्रकरणी तुळिंज पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

नालासोपारा पूर्वकडील रस्त्यावर शुक्रवारी विलिब्रेड शाळेत काम करणाऱ्या प्रमिला रहाटे (३८) या पायी चालल्या होत्या. त्याचवेळी भरधाव डम्परने त्यांना धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, महिलेचे डोके मागच्या चाकाखाली गेले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर रस्त्यावर मोठी गर्दी झाली होती. तुळिंज पोलिस ठाण्याच्या पथकाने मृतदेह पंचनामा करण्यासाठी पाठवून आरोपी डम्पर चालकाला ताब्यात घेतल्यानंतर घटनास्थळी वाहतूक सुरळीत झाली.

Scanned with CamScanner

म.टा. फ्रंट पेज क्र. 2 दि. 01/04/2023

# भाजपचा स्थापनादिन धुमधडाक्यात

**देशभरात साजरा होणार; मागासवर्गाकडे सर्वाधिक लक्ष**

म. टा. विशेष प्रतिनिधी, नवी दिल्ली

भारतीय जनता पक्षाचा ४३वा स्थापना दिन येत्या ६ एप्रिल रोजी (गुरुवारी) देशभरात धुमधडाक्यात साजरा करण्यासाठी सज्जता करण्यात आली आहे. यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी दिल्लीतील बालयोगी सभागृहातून देशभरातील कार्यकर्त्यांना संबोधित करणार आहेत. पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या तयारीला लागलेल्या भाजपने स्थापना दिनाच्या निमित्ताने पक्षाला सातत्याने भरभरून मते देणाऱ्या मागासवर्गीयांकडे आणखी लक्ष देण्याचे ठरविल्याचेही स्पष्ट आहे. या समाजाची दैवते असलेल्या महापुरुषांच्या जयंतीनिमित्त देशभरातील भाजप नेत्यांनी व्यापक कार्यक्रम घ्यावेत, असे निर्देश दिल्लीतून देण्यात आले आहेत.

दरम्यान, कर्नाटकासह आगामी विधानसभा निवडणुकांची तयारीही भाजपने गतिमान केली आहे. पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी येत्या मंगळवारी, ४ एप्रिल रोजी विनोद तावडे यांच्यासह सर्व भाजप राष्ट्रीय महासचिवांची निवडणूक तयारी आढावा बैठक बोलावली आहे. कर्नाटकात यंदा पक्षाला फारसे अनुकूल वारे वाहत नसल्याचा अभिप्राय दिल्लीला मिळाला आहे. भाजपने यंदाही आपला स्थापना दिवस थाटामाटात साजरा करण्यासाठीची तयारी दिल्लीत तरी अंतिम टप्प्यात आणली आहे. पक्ष मुख्यालयात रोज रात्री उशिरापर्यंत नेत्यांच्या आढावा बैठका सुरू आहेत. या पक्षाला यंदा ४३ वर्षे पूर्ण होतील. त्यानिमित्ताने राज्यघटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीपर्यंत (६ ते १४ एप्रिल) देशभरात सामाजिक न्याय सप्ताह म्हणून साजरा करण्याचा निर्णय भाजपने घेतला आहे. या दरम्यान गरीब, शोषित, वंचित, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी मोदी सरकारने घेतलेल्या निर्णयांची माहिती गावपातळीपर्यंत पोहोचविली जाईल.

देशात सर्वाधिक खासदार, आमदार आणि नगरसेवक व अनेक राज्यात सरकार असलेल्या भाजप नेतृत्वाच्या वतीने देशभरातील नेते-कार्यकर्त्यांना पक्षाचा स्थापना दिन उत्साहात साजरा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### आंबेडकर, फुले जयंती साजरी करा!

डॉ. आंबेडकरांसह ओबीसी समाजाच्या पाठिंब्याचीही खात्री पटावी यादृष्टीने महात्मा ज्योतीबा फुले यांची जयंती ११ एप्रिलला देशभरात साजरी करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. दोन्ही कार्यक्रमांत मोदी सरकार आणि राज्यातील भाजप सरकारांनी मागासवर्गीयांसाठी घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयांवर चर्चा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याशिवाय प्रत्येक जिल्ह्यातील ज्येष्ठ भाजप कार्यकर्त्यांचे, गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार करण्याच्याही सूचना देण्यात आल्या आहेत.

सकाळ पान क्र.5

# खदाणीत पडून तरुणाचा मृत्यू

नालासोपारा, ता. ३१ (बातमीदार) : वसई पूर्व वाघराळपाडा परिसरात डोंगर खोदून अनधिकृत खदाणी निर्माण झाल्या आहेत. अशाच एका खदाणीत पडून २६ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना आज (ता. ३१) दुपारी उघड झाली आहे. वालीव पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

सुनील दुबे (वय २६) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव असून तो मुली देवी आणि चार वर्षांच्या मुलासह वाघराळपाडा परिसरात राहत होता. त्याची पत्नी भाजीपाला विकत होती, तर तो मजुरीचे काम करत होता. शुक्रवारी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास त्याचा मृतदेह एका खदाणीत आढळून आला. खदाणीच्या आजूबाजूला मोठमोठे डोंगर आहेत. याच डोंगरावर तो मद्यप्राशन करून गेला होता आणि त्याचा तोल जाऊन तो पडल्याने मृत्यू झाल्याचा संशय नागरिक आणि पोलिसांनी व्यक्त केला आहे. मात्र या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे, असे सांगण्यात आले.

# 'मोदी सरकारकडून जनतेची दिशाभूल'

नालासोपारा, ता. ३१ (बातमीदार) : भाजपचे मोदी सरकार केंद्रात सत्तेत आल्यापासून जनतेची दिशाभूल करण्यात येत आहे. त्यांची आम्ही पोलखोल करून देशातील जनतेला सावध करणार, असा इशारा प्रदेश कार्याध्यक्ष तथा माजी मंत्री नसीम खान यांनी मोदी सरकारला दिला. आज (ता. ३१) त्यांनी भाजप, मोदी सरकारवर ताशेरे ओढले.

वसई पूर्व सातिवली रेंज नाका येथील एका हॉटेलमध्ये नसीम खान यांनी पत्रकार परिषद घेऊन केंद्र सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहेत. या वेळी संदीप पांडे, ओनिल अल्मोडा, जोजो थॉमस, प्रफुल पाटील आदी उपस्थित होते.

नसीम खान म्हणाले की, देशाची लोकशाही संपुष्टात येत आहे. बेरोजगारी, महागाई, भ्रष्टाचाराने देश होरपळत आहे. याविरोधात राहुल गांधी लढा देत आहेत. अदाणी-मोदी यांचे हितसंबंध आहेत आणि ते पुराव्यानिशी राहुल गांधी यांनी जनतेसमोर आणल्याने त्यांचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

Scanned with CamScanner

सकाळ पान क्र.4 दि. 01/04/2023

# शिंदे-ठाकरे गट आमनेसामने

## भाईंदरमध्ये विकास कामांच्या उद्‌घाटनावरून वाद

भाईंदर, ता. ३१ (बातमीदार) : मिरा-भाईंदर महापालिकेच्या विकासकामांच्या उद्‌घाटनावरून शिंदे व ठाकरे गट आमने-सामने आले आहेत. शहरातील विकासकामांचे उद्या (ता. १) उद्‌घाटन शिवसेनेचे आमदार प्रताप सरनाईक यांच्या हस्ते होणार आहे. मात्र या कार्यक्रमाला ठाकरे गटाचे खासदार राजन विचारे यांना निमंत्रित करण्यात आले नसल्याने राजशिष्टाचाराचे उल्लंघन झाले असल्याचा आरोप ठाकरे गटाकडून करण्यात आला आहे.

मिरा-भाईंदर महापालिकेने भाईंदर पूर्व येथील प्रभाग तीनमध्ये बांधलेल्या लोकमान्य टिळक सभागृहाचे लोकार्पण प्रताप सरनाईक यांच्या हस्ते शनिवारी करण्यात येणार आहे. हे सभागृह बांधण्यासाठी आमदार प्रताप सरनाईक यांच्या आमदार निधीतून २५ लाख, खासदार राजन विचारे यांच्या खासदार निधीतून २५ लाख रुपये देण्यात आले आहेत. सभागृह होण्यासाठी आपण सातत्याने पत्रव्यवहार केला आहे, तसेच खासदार राजन विचारे यांनीही पाठपुरावा केला. मात्र या सभागृहाच्या लोकार्पणासाठी खासदार राजन विचारे यांना निमंत्रितच करण्यात आले नाही. कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेवरही विचारे यांचे नाव नमूद करण्यात आलेले नाही, अशी माहिती ठाकरे गटाचे माजी नगरसेवक दिनेश नलावडे यांनी दिली.



### ‘जलवाहिनीच्या उद्‌घाटनाची माहिती नाही’

नवघर, गोडदेव आदी परिसरासाठी पाणीपुरवठा सुरळीत व्हावा, यासाठी महापालिकेने टाकलेल्या नव्या जलवाहिनीचे उद्‌घाटनही सरनाईक यांच्या हस्ते केले जाणार आहे. त्यावरही ठाकरे गटाने आक्षेप घेतला आहे. ही जलवाहिनी टाकण्याची कल्पना ठाकरे गटाच्या नगरसेवकांची होती व त्याचा पाठपुरावा करण्यात आला होता. मात्र जलवाहिनीच्या उद्‌घाटनाची ठाकरे गटाच्या माजी नगरसेवकांना कोणतीही कल्पना देण्यात आली नाही, असा आरोप माजी गटनेत्या नीलम ढवण यांनी केला.

आमदार निधीतून दिलेल्या विकासकामांचे उद्‌घाटन मी करत आहे. खासदारांनी निधी दिलेल्या कामाचे श्रेय मला घ्यायचे नाही. त्यांनीही उद्‌घाटन करावे. मला त्यावर कोणताही आक्षेप नाही.
- **प्रताप सरनाईक**, आमदार

राजशिष्टाचाराचे पालन करण्यात आलेले नाही. आयुक्त, जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करण्यात येणार आहे.
- **लक्ष्मण जंगम**, उपजिल्हा प्रमुख, ठाकरे गट



लोकमत पु. पान क्र.4

# वरिष्ठ पोलिस निरीक्षक देसाई यांची उचलबांगडी

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : गुटखा विक्रीसाठी १० हजारांच्या लाच प्रकरणात नवघर पोलिस ठाण्याच्या हवालदारास अटक झाल्यानंतर तेथील वरिष्ठ पोलिस निरीक्षक मिलिंद देसाई यांची उचलबांगडी करून त्यांची नियंत्रण कक्षात नेमणूक केली आहे.

२९ मार्चला ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुटख्याची पूर्वी विक्री करणाऱ्याकडून गुटखा विकण्यासाठी १० हजारांची लाच घेतल्याप्रकरणी हवालदार अमितकुमार पाटील व त्याचा पंटर अमित मिश्रा या दोघांना अटक केली होती. हप्ते घेऊन सर्रास गुटखा विक्री करण्यास मोकळीक दिली जात असल्याची टीका पोलिसांवर होऊ लागली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर गुटखा लाच प्रकरणाची दखल घेत पोलिस आयुक्त मधुकर पांडेय यांनी ३१ मार्चला देसाई यांची उचलबांगडी करून पोलिस आयुक्तालयाच्या नियंत्रण कक्षात नियुक्ती केली आहे.

Scanned with CamScanner

लोकसत्ता पान क्र. 13

दि. 01/04/2023

# वसई, विरार शहरातही करोनाचा पुन्हा शिरकाव

## रुग्णसंख्येत अचानक वाढ, पालिकेचा करोना नियंत्रण कक्ष सुरू

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई, विरार शहरात पुन्हा करोनाचे रुग्ण आढळून आल्याने पालिकाने नागरिकांना सावधगिरीच्या सूचना दिल्या आहेत. डिसेंबरपासून शून्य रुग्ण संख्या असताना अचानक मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात रुग्ण आढळून येऊ लागले आहे. मागील सहा दिवसांत ३२ रुग्ण आढळून आले आहेत. तर बुधवारी शहरात एकाच दिवसात १० रुग्ण आढळले आहेत.

८ डिसेंबर २०२२ पासून शहरात करोना रुग्णसंख्या शून्य होती. १० फेब्रुवारी रोजी रुग्ण आढळण्यास सुरुवात झाली. मात्र त्यांची संख्या एक आकडी होती. दिवसाला केवळ एक ते दोन रुग्ण असायचे. मात्र मार्चच्या शेवटच्या आठवड्यात रुग्ण संख्या वाढू लागली. बुधवारी शहरात एकाच दिवसात १० रुग्ण आढळले.

नागरिकांनी करोना नियमांचे पालन करावे असे आवाहन पालिकेच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. भक्ती चौधरी यांनी केले. रुग्ण वाढत असले तरी ते सौम्य लक्षणे असलेली आहेत. रुग्णांना ओमायक्रॉनची लागण झालेली आहे, असे चौधरी यांनी सांगितले. करोनाचे रुग्ण असले तरी सध्या एकही 'एच३एन२' चा रुग्ण आढळला नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### काळजी काय घ्यावी?

सर्दी, खोकला, श्वसनाचा त्रास, अंगदुखी, घशामध्ये खवखव, धाप लागणे, तीव्र खोकला असल्यास करोना चाचणी करण्याचे आवाहन डॉक्टरांनी केले आहे. या वाढत्या करोनारुग्णांमुळे प्रत्येकाने मुखपट्टी (मास्क) वापरावा असे पालिकेने सांगितले आहे. नागरिकांनी घाबरू नये मात्र करोना नियमांचे पालन करण्यास सुरुवात करावे असेही पालिकेच्या आरोग्य विभागाने सांगितले आहे.

### पालिकेचा आरोग्य विभाग सज्ज

करोनाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने बैठक घेऊन करावयाच्या उपाययोजनांचा आढावा घेतला. रुग्ण वाढल्यास पुरेसा औषध साठा तयार ठेवण्यात आला आहे. पालिकेच्या विरार येथील चंदनसार येथील रुग्णालयात करोनाचा एक विभाग सुरू करण्यात आला आहे. इतर बंद करोना केंद्रे गरज पडल्यास पुन्हा सुरू केली जाणार असल्याचे पालिकेने सांगितले.



# शहरातील अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** वसई-विरार महापालिकेच्या अतिक्रमणविरोधी पथकाने गुरुवारी प्रभाग समिती जी मधील बापाणे, ससूनवघर व वालीव अशा ठिकाणी अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली. या कारवाईत सुमारे २३ हजार चौरस फुटांचे अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त केले.

वसई, विरार शहरातील विविध ठिकाणच्या भागात भूमाफियांकडून अनधिकृत बांधकामे उभारण्याचे काम सुरूच आहे. याविरोधात पालिकेच्या अतिक्रमणविरोधी पथकाने सातत्याने कारवाई सुरू केली आहे.

गुरुवारी बापाणे रेल्वे पुलाजवळच्या सर्व्हे नं. ४०/१ येथे चार हजार चौरस फुटांचे अनधिकृत पत्राशेड वीट बांधकाम तर वालीव धुमाळनगर येथे पत्रा व चॅनल शेडचे १५ हजार चौरस फुटांचे अनधिकृत बांधकाम याशिवाय ससूनवघर येथील रॉयल गार्डनच्या मागे सर्व्हे नं.२३६ येथे एक रूम १५ प्लिंथचे चार हजार चौरस फूट असे एकूण २३ हजार चौरस फुटांचे अनधिकृत बांधकाम जेसीबीच्या साहाय्याने जमीनदोस्त करण्यात आले आहे.

सदरची कारवाई अतिक्रमण विभागाचे उपायुक्त अजित मुठे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी सहायक आयुक्त दयानंद मानकर, कल्पेश कडव व गौरव परिहार व त्यांच्या पथकाने केली आहे.

# नालासोपाऱ्यात वेश्या व्यवसायावर कारवाई

**वसई :** नालासोपाऱ्याच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक शाखेने वेश्या व्यवसायावर कारवाई करून दोन पीडित महिलांची सुटका केली आहे. याप्रकरणी दलालांना अटक करून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सापळा रचून बोगस गिऱ्हाईक पाठवून पेल्हार पोलीस ठाण्याचे हद्दीत तुंगारेश्वर फाटा, वसई पूर्व या ठिकाणी छापा टाकला. यामध्ये दलाल हरेश्वर केशव राऊत व गुंडम्मा रानप्पा मांगी ऊर्फ राजश्री या दोन जणांना अटक केली आहे. आरोपींकडून रिक्षासह एक लाख दोन हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करून दोन पीडित महिलांची सुटका केली आहे. पेल्हार पोलीस ठाण्यात आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष चौधरी, पोलीस हवालदार बापू पवार महिला पोलीस हवालदार साक्षी डोड़फोडे व त्यांच्या पथकाने केली आहे.

Scanned with CamScanner

लोकसत्ता पान क्र. ४

दि. 01/04/2023

# दंगलीच्या तपासासाठी 'एसआयटी'

## तणावपूर्ण शांतता

लोकसत्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** हिंसाचाराचा तपास करण्यासाठी पोलीस निरीक्षक संभाजी पवार यांच्या अध्यक्षतेखाली दहा जणांच्या विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली आहे. तपास पथकाच्या कामकाजावर वरिष्ठ अधिकारी नियंत्रण ठेवणार असल्याचे पोलीस उपायुक्त शीलवंत नांदेडकर यांनी शुक्रवारी सांगितले. दंगलप्रकरणी आठ जणांना अटक करण्यात आली असून परिस्थिती नियंत्रणात असून राम मंदिर परिसर, किराडपुरा भागात शीघ्र कृती दल, राखीव पोलीस दल आणि दंगल नियंत्रक वाहने तैनात आहेत.

## उद्योग जगतात अस्वस्थता

धार्मिक ध्रुवीकरणाच्या प्रयोगासाठी मराठवाड्याच्या भूमीचा सातत्याने वापर केला जात आहे. त्यामुळे विकासाला प्रोत्साहन देणाऱ्या उद्योजकांनी निर्माण केलेल्या वातावरणावर त्याचा वाईट परिणाम होऊ शकतो. अशा परिस्थितीत नेत्यांनी संयम दाखवावा अशी प्रतिक्रिया उद्योग जगतातून व्यक्त होत आहे. दरम्यान शहरात शांतता राहावी यासाठी आम्ही प्रयत्न सुरू केले आहेत. भाजपचे हिंदुत्व हे विचारी असून त्याचा विकासासाठीच आम्ही उपयोग करू, असे केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड यांनी सांगितले.

## महाविकास आघाडीच्या सभेस परवानगी

महाविकास आघाडीची बांधणी जिल्हा पातळीवर करण्यासाठी २ एप्रिल रोजीच्या 'वज्रमूठ' सभेस पोलिसांनी परवानगी दिली असल्याची माहिती विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांनी दिली. छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या दंगलीच्या पार्श्वभूमीवर या सभेला परवानगी मिळणार नाही, अशी चर्चा होती. याच दिवशी भाजपच्या वतीने 'सावरकर यात्रा' काढली जाणार आहे. त्यांचे हे कृत्य खोडसाळपणाचे असून त्यांना सावरकरांचा विज्ञानवाद मान्य आहे का, त्यांचे विचार पेलण्याची ताकद भाजपमध्ये नाही. त्यांनी जरूर यात्रा काढावी पण खोडसाळपणा करू नये, असे दानवे म्हणाले.

## जालना खूनप्रकरणी दोघांना अटक

जालना : श्रीराम नवमीनिमित्त गुरुवारी जालना शहरात काढण्यात आलेल्या मिरवणुकीतील वादात एका युवकाचा धारदार शस्त्राने खून करण्यात आला. या प्रकरणी सदर बाजार पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. श्रीराम नवमीची मिरवणूक जालना शहरातील आर. पी. रस्त्यावर आली असताना रात्री साडेदहाच्या सुमारास ही घटना घडली. विष्णू रामकिसन सुपारकर (वय २९ ) असे मृत्युमुखी पडलेल्या युवकाचे नाव आहे. मिरवणुकीत नाचताना धक्का लागल्याच्या कारणावरून ही घटना घडल्याचे सांगण्यात येते.

## पश्चिम बंगालमध्ये पुन्हा हिंसाचार

हावडा : पश्चिम बंगालमधील हावडा शहरातील काजीपाडा भागात रामनवमीनिमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीदरम्यान हिंसाचार घडला होता. यानंतर बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिसांवर शुक्रवारी काहींनी दगडफेक केली. यामुळे तणाव वाढला आहे. दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी हावडामधील हिंसाचाराच्या घटनेबाबत राज्यपाल सी. व्ही. आनंद बोस यांच्याबरोबर चर्चा करून माहिती घेतली. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना लाठीमार करावा लागला.

## दंगलखोरांचा कसून शोध

हिंसाचारानंतर छत्रपती संभाजीनगरमधील शहरातील जनजीवन शुक्रवारी सुरळीत झाले. पोलिसांची गोळी लागून मृत झालेले ४५ वर्षांचे शेख मुनिरोद्दीन यांच्यावर पहाटे पोलीस बंदोबस्तात अंत्यसंस्कार करण्यात आले. हिंसाचार व जाळपोळ प्रकरणात गुन्हे दाखल असलेल्या सहा जणांमध्ये मृत मुनिरोद्दीन यांच्या नावाचाही समावेश करण्यात आला आहे. वास्तविक मृत फैज कॉम्प्लेक्सच्या लोखंडी गेटच्या आतमध्ये उभे होते. तरी त्यांचे नाव आरोपीच्या यादीत कसे, असा प्रश्न या भागातील नागरिक उपस्थित करीत आहेत. दरम्यान, पोलिसांनी ५०० जणांविरुद्ध गुन्हा दाखल केलेला असल्याने आपल्याला अटक होईल या भीतीने किराडपुरा आणि भोवतालचे अनेक जण आपल्या घरांना टाळे लावून इतरत्र गेले आहेत.

## मालवणी हाणामारी : २० जणांना अटक

**मुंबई :** मालाड परिसरातील मालवणी येथे रामनवमीनिमित्त काढण्यात आलेल्या शोभायात्रेदरम्यान दोन गटांमध्ये शाब्दिक चकमक उडाली. त्याचे पर्यवसान हाणामारीत झाले. याप्रकरणी २० जणांना अटक करण्यात आली असून बोरिवली न्यायालयाने त्यांना सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. या प्रकरणात २०० ते ३०० अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मालवणीमध्ये ड्रोन आणि सीसी टीव्ही कॅमेऱ्यातील चित्रीकरणाच्या माध्यमातून तणाव निर्माण करणाऱ्यांची ओळख पटवली जात असून संबंधितांना अटक करण्यात येत आहे. २०० ते ३०० अज्ञातांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. २० हून अधिक व्यक्तींना ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे.

या प्रकरणात आणखी काही जणांच्या अटकेची शक्यता पोलिसांनी वर्तवली. या प्रकरणात बेकायदा जमाव जमवणे, सरकारी कामात अडथळा आणणे अशा प्रकारच्या कलमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पुण्यनगरी पू. पान क्र. १

# वसईतील कंपन्यांचे फायर ऑडिट करण्याची मनसे दिव्यांग सेनेची मागणी

**वसई :** वसई पूर्वपट्टीतील प्रभाग समिती जी हद्दीतील कंपन्यांचे फायर ऑडिट करावे, तसेच फायर ऑडिट न केलेल्या कंपनी मालकावर आणि कंपनीवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी मनसेचे दिव्यांग वसई-विरार शहर अध्यक्ष देवीदास जयवंत केंगार आणि वॉर्ड क्रमांक ९० चे अध्यक्ष अल्ताफ सय्यद यांनी मुख्य अग्निशमन अधिकारी दिलीप पालव यांच्याकडे केली.

वसई पूर्वपट्टी औद्योगिक वसाहत मोठ्या प्रमाणात असल्याकारणाने या ठिकाणी अनेक कामगार वर्गाची तसेच दिव्यांग कामगार वर्गाची, महिलांची वर्दळ सतत सुरू असते. तसेच प्रभाग समिती जी हद्दीत वालीव धुमाळ नगर, वालीव फाटा (तारखे नगर), चिंचोटी, सातिवली या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कंपन्यांना लागूनच अनेक मोठ्या प्रमाणात गाव वस्ती आहे. तसेच आपल्या परिवाराची आणि स्वतःची देखभाल करण्यासाठी अनेक लांबून कामगार वर्ग या ठिकाणी काम करण्यासाठी येत असतो. प्रभाग समिती जी हद्दीत अनेक ठिकाणी अनेक कंपन्यांना आग लागून भीषण अपघातसुद्धा झाले आहेत, तर काही निष्पापांचा जीवसुद्धा गेला आहे. प्रभाग समिती जी च्या हद्दीत अनेक ठिकाणी कंपन्या महानगरपालिकेतून कोणतीही परवानगी तसेच फायर ऑडिट न करता बिनदिक्कत कंपनी चालवत आहेत. त्यांच्या या हलगर्जीपणामुळे तसेच महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे वारंवार कंपन्यांना आग लागण्याची संख्या वाढत चालली आहे. त्यामुळे कंपन्यांना आग लागू नये, यासाठी त्यांची फायर ऑडिट करणे सक्तीचे आहे. तसेच फायर ऑडिट न करणाऱ्या कंपनी मालकावर तसेच कंपन्यांवर त्वरित कारवाई करण्याची मागणी मनसे दिव्यांग सेनेने केली आहे.

Scanned with CamScanner

दि.01/04/2023

पुण्यनगरी पृ. पान क्र.4

# मीरा-भाईंदरमध्ये रविवारी स्वातंत्र्यवीर सावरकर गौरव यात्रा

**मीरा रोड :** महाराष्ट्रात, भारतीय जनता पक्ष आणि शिवसेने (शिंदे गट)ने काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या सततच्या अवमानकारक आणि दिशाभूल करणाऱ्या विधानांना विरोध करण्यासाठी राज्यभर सावरकर गौरव यात्रा काढण्याची घोषणा केली आहे. ही गौरव यात्रा ३० मार्च ते ६ एप्रिल दरम्यान राज्यभर काढण्यात येणार आहे. त्याचाच भाग म्हणून मीरा-भाईंदर शहरात ही यात्रा २ एप्रिल रोजी काढण्यात येणार आहे. त्याबाबतची माहिती आमदार प्रताप सरनाईक, आमदार गीता जैन, भाजप जिल्हाध्यक्ष रवि व्यास यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत दिली आहे.

मीरा-भाईंदरमध्ये ही गौरव यात्रा २ एप्रिल दुपारी १२ वाजता भाईंदर पश्चिमेच्या सुभाषचंद्र बोस मैदानापासून ते काशिमीरा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापर्यंत सावरकर गौरव यात्रा काढण्यात येणार असून वीर सावरकरांचे बलिदान, तपश्चर्या तसेच वीर सावरकरांचा त्याग आणि त्यांची भूमिका याविषयी संपूर्ण शहरवासीयांना माहिती दिली जाणार आहे. काँग्रेसकडून सातत्याने होत असलेल्या स्वातंत्र्यसैनिकांच्या अवमानाला चोख प्रत्युत्तर दिले जाणार आहे. गौरव यात्रेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन भाजप, शिवसेनेकडून करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेला संबोधित करताना शिवसेनेचे आमदार प्रताप सरनाईक म्हणाले की, आपण लहानपणापासून वीर सावरकरांची वीरगाथा वाचून मोठे झालो असून सावरकरांचा अपमान आपण कदापि सहन करणार नाही. एकीकडे, उद्धव ठाकरे यांचे पुत्र आदित्य ठाकरे आणि त्यांचे धर्मांध नेते संजय राऊत हे सावरकरांचा अपमान करणारे राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रेत सहभागी होतात आणि दुसरीकडे सावरकरांचा अपमान सहन करणार नाही, अशा गप्पा मारतात. अशी दुटप्पी भूमिका पटण्यासारखी नाही. तर आमदार गीता जैन म्हणाल्या की, काँग्रेस हा सध्या मुद्दाहीन पक्ष आहे, त्याला लोकहित नाही. त्यामुळे ते स्वातंत्र्यसैनिकांचा अपमान करत आहेत, ज्यामुळे भविष्यात नजीकच्या काळात त्यांचे पतन होईल, असे आमदार गीता जैन यांनी सांगितले.

पुढारी पान क्र.5

# राहुल गांधी यांच्या समर्थनार्थ चौक सभा

## माजी आ. मुझफ्फर हुसेन यांची माहिती

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

अदानी कंपनीत एका रात्रीत अब्जावधी रुपये गुंतवले गेल्याने त्याच्या चौकशीसाठी राहुल गांधी यांनी संसदेत जेपीसी (संयुक्त संसदीय समिती) स्थापन करण्याची मागणी केली होती. यामुळेच त्यांच्यावर सूडाच्या भावनेने केंद्रातील सरकारने न्यायपालिकेवर दबावतंत्राचा वापर करून राहुल गांधी यांना दोषी ठरविले. त्यांची खासदारकी रद्द केली. केंद्र सरकारच्या या षडयंत्राविरोधात तर राहुल गांधी यांच्या समर्थनार्थ मिरा-भाईंदर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटी शहरभर चौक सभा, रॅलीचे आयोजन करणार असल्याची माहिती काँग्रेसचे स्थानिक नेते माजी आ. मुझफ्फर हुसेन यांनी शुक्रवारी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.



अडानी कंपनीत सुमारे २३ हजार कर्मचारी, टाटा कंपनीत सुमारे ६ लाख तर रिलायन्समध्ये सुमारे ४ लाख कर्मचारी असताना २३ हजार कमर्चारी असलेल्या अदानी कंपनीत एका रात्रीत हजारो कोटींची गुंतवणूक केली गेली. या संपूर्ण व्यवहाराची चौकशी जेपीसीद्वारे करण्याची मागणी राहुल गांधी यांनी केली होती.

हि मागणी मान्य करणे केंद्र सरकारला कोणतीही अडचणीची बाब ठरणार नव्हती कारण केंद्रात भाजपचे सर्वाधिक सदस्य असून जेपीसी मधील भाजपची सदस्य संख्या देखील अधिकच राहणार आहे. असे असताना केंद्र सरकारला जेपीसी स्थापन करण्यास भिती वाटते. जेपीसीला बगल देण्यासाठीच केंद्र सरकारने पोयनाड येथे मोदी आडनावे असलेल्या लोकांवर केलेले आरोप मोदी यांनी व्यक्तिशः घेत एका व्यक्तीद्वारे थेट गुजरात उच्च न्यायालयात सिव्हिल पिटिशन दाखल केली. हि सिव्हिल पिटिशन असताना केंद्र सरकारच्या दबावामुळे ती क्रिमिनल पिटिशनमध्ये प्रवर्तित करण्यात आली. गांधी यांनी कोणताही गंभीर क्राईम केला नसताना त्यांच्यावर क्रिमिनल आरोप ठेवून त्यांना दोषी ठरविल्याचा आरोप मुझफ्फर यांनी केला. वीर सावरकर हे देशाचे स्वातंत्र्य सेनानी आहेत. त्यांचा आदर व सन्मान सर्वांनीच केला पाहिजे. मात्र राहुल गांधी यांची प्रतिक्रीया व्यक्तिगत असून त्याचे उत्तर तेच देतील, अशी सारवासारव त्यांनी केली. पत्रकार परिषदेवेळी जिल्हाध्यक्ष प्रमोद सामंत, प्रवक्ता प्रकाश नागणे, युवा पदाधिकारी फारूक शेख आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

दि. 01/04/2023


पुढारी पृ. पान क्र. ३

# कायदा सुव्यवस्था राबवितानाच दर्जाही उंचावत ठेवणार

## पोलीस उपायुक्त पौर्णिमा चौगुले-श्रींगी यांचे प्रतिपादन

**वसई : अनिलराज रोकडे**

मीरा-भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालयातील वसई परिमंडळ -२ च्या पहिल्या महिला पोलीस उपायुक्त म्हणून श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी यांनी बुधवारी आपला पदभार स्वीकारला. वसई परिमंडळ -२ मधून पोलीस उपायुक्त संजयकुमार पाटील यांची नवी मुंबई येथे बदली झाल्यानंतर गेले चार महिने ही जागा रिक्त होती. अखेर ही जागा नाशिक येथून आलेल्या पोलीस उपायुक्त श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी यांच्या नियुक्तीने भरण्यात आली आहे. मीरा-भाईंदर, वसई- विरार या अवघ्या दोन वर्षांपूर्वी नव्याने अस्तित्वात



आलेल्या पोलीस आयुक्तालयाने गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण, कॉल ११२ डायलिंग आणि अन्यही कायदा सुव्यवस्था राबविताना विविध क्षेत्रात उंचावलेला दर्जा टिकवून ठेवण्यासाठी आपण कसोशीने प्रयत्न करणार असल्याचे पोलीस उपायुक्त श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी यांनी आज पुढारीशी बोलताना सांगितले.

पदभार स्वीकारतात त्यांनी सर्वाधिक गुन्हेगारीची नोंद होणाऱ्या तुळिंज पोलीस ठाण्यात भेट देऊन, सर्व परिस्थिती जाणून घेतली आहे. महिलांच्या अत्याचारांचे वाढते प्रमाण लक्षात घेता महिलांची सुरक्षा हे महत्वाचे टार्गेट ठेवून, त्या त्या पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील समस्या आणि शहराची रचना लक्षात घेऊन, गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी प्रयत्न करणार असेही त्या म्हणाल्या.

मुंबईच्या वेशीवरील उपनगर म्हणून वसई, विरार, नालासोपारा, आणि मीरा भाईंदर शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. परिमंडळ वसई -२ च्या हद्दीत नालासोपारा पूर्व, तुलिंज, आचोळा, वालीव, माणिकपूर, वसई आणि नव्याने निर्माण झालेले नायगाव असे ६ पोलीस ठाणे येतात. त्यापैकी तुळिंज, आचोळा, वालीव आणि नायगाव या पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगारीचे प्रमाण सर्वाधिक असून त्याला चाप लागणार आहे. पोलीस उपायुक्त यांनी आतापासूनच शहरातील कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी कडक उपाययोजना करण्यावर भर दिला आहे.

> पोलीस आयुक्तालयाने गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण, कॉल ११२ डायलिंग आणि अन्यही कायदा सुव्यवस्था राबविताना विविध क्षेत्रात उंचावलेला दर्जा टिकवून ठेवण्यासाठी आपण कसोशीने प्रयत्न करणार आहोत.आता दोन दिवसात शहराची रचना, गुन्हेगारीचे स्वरूप लक्षात घेऊन, पोलीस दलातील 'सद् रक्षणाय, खल निग्रहनाय' या ब्रीद वाक्याला अनुसरून मी काम करणार आहे. महिलांच्या सुरक्षेला सर्वाधिक मी प्राधान्य देणार आहे.
>
> - पौर्णिमा चौगुले-श्रींगी ,
> पोलीस उपायुक्त,
> मीरा -भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालय

Scanned with CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 26 अंक-286 मुंबई, शनिवार 1 अप्रैल 2023 पृष्ठ-12 मूल्य : 2.00

# महिला दलाल समेत दो गिरफ्तार

**वसई :** देह व्यापार को उकसाने वाले आरोपियों की गिरफ्तारी एवं दो पीड़ित महिलाओं को छुड़ाने में अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा टीम को सफलता मिली है। यह कार्रवाई डीसीपी (क्राइम) अविनाश अंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा पी.आई संतोष चौधरी के नेतृत्व पुलिस अधिकारी-कर्मचारी की टीम ने की है।




यह जानकारी पुलिस अधिकारी ने शुक्रवार को दी है। पुलिस अधिकारी ने बताया कि 29 मार्च को अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा को गुप्त सूचना मिली कि वेश्या दलाल (1).हरेश्वर केशव राउत (2).गुंडम्मा रामप्या भांगी ऊर्फ राजश्री ये महिलाओं को पैसे का लालच देते हैं व वेश्यावृत्ति के लिए महिलाओं को उपलब्ध कराने के लिए अलग-अलग ग्राहकों को अलग-अलग जगहों पर आमंत्रित करते हैं। मिली सूचना के आधार पर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा के पी.आई संतोष चौधरी ने पुलिस स्टॉफ, बोगस ग्राहक और दो पंचों के साथ पेल्हार पुलिस स्टेशन की सीमा के भीतर तुंगारेश्वर फाटा, वसई पूर्व में छापा मारा, इस दौरान आरोपी (1).हरेश्वर केशव राउत, निवासी- चिखल डोंगरी, विरार पश्चिम व (2).गुंडम्मा रानप्पा भांगी ऊर्फ राजश्री, निवासी-अंधेरी मुंबई को हिरासत में लिया और उनके द्वारा अपराध में प्रयुक्त रिक्शा भी शामिल कुलमिलाकर 01,02,670 रुपये का माल जब्त किया गया है तथा दो पीड़ित महिलाओं को देह व्यापार से मुक्त कराया गया है। उक्त मामले में पुलिस हवलदार बापू पवार द्वारा पेल्हार थाने में आरोपियों पर कलम 370 (1) (3), 34 सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कानून 1956 कलम 4,5 के तहत एफआईआर दर्ज करवाया है।

# हेरोइन के साथ एक गिरफ्तार

**वसई :** नालासोपारा पश्चिम इलाके से नालासोपारा पुलिस ने एक 33 वर्षीय शख्स को हेरोइन ड्रग्स के साथ गिरफ्तार किया है। इस मामले में पुलिस ने नालासोपारा पुलिस स्टेशन आरोपी के खिलाफ एनडीपीएस एक्ट के तहत केस दर्ज किया गया है। मिली जानकारी के अनुसार, 30 मार्च को नालासोपारा पुलिस स्टेशन ने गुप्त सूचना के आधार नालासोपारा पश्चिम के सोपारा गाँव के वाझा मोहल्ला के पास मैदान स्थित एक 33 वर्षीय (हुसैन आदम शेख ) शख्स को हिरासत में लिया, शख्स के पास से 7.750 ग्राम वजन हेरोइन ड्रग्स जप्त किया, पुलिस ने बताया कि ड्रग्स की कीमत 30,000 रुपये आकी गयी है।

Scanned with CamScanner

लोकमत

# उद्या पात्र पोलिस शिपाई उमेदवारांची लेखी परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : पोलिस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर सुरु असलेल्या पोलिस शिपाई पदाच्या प्रक्रियेत शारीरिक चाचणीत पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा उद्या होणार आहे. सकाळी साडेआठ ते दहा वाजण्याच्या दरम्यान पुरुष उमेदवारांची परीक्षा भाईंदरच्या नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान याठिकाणी होईल. तर महिला उमेदवारांसाठी भाईंदरच्या स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे मैदान याठिकाणी घेण्यात येणार आहे. सर्व पात्र उमेदवारांनी रविवारी सकाळी ठिक ५ वाजता हजर राहण्याचे आवाहन केले आहे.

सर्व उमेदवारांनी वेळेमध्ये नमूद ठिकाणी हजर राहणे बंधनकारक आहे. तसेच परीक्षा सुरु झाल्यानंतर आलेल्या उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत प्रवेश दिला जाणार नाही. उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी महाआयटीकडून प्रवेशपत्र निर्गमित केले आहेत. ते http : / policerecruitment2020.mahait.org या वेबसाईटवरुन उमेदवारांनी आपला युजर आयडी व पासवर्डचा वापर करुन प्रवेशपत्र डाउनलोड करावेत. तसेच पासपोर्ट साईज २ कलर फोटो, आधार कार्ड / पॅन कार्ड / निवडणूक आयोगाचे ओळखपत्र / ड्रायव्हिंग लायसन्स सोबत आणणे बंधनकारक आहे. लेखी परीक्षेसाठी दिलेले ओळखपत्राशिवाय उमेदवारास परीक्षेसाठी प्रवेश देण्यात येणार नाही. महाआयटीकडून ओळखपत्र प्राप्त न झाल्यास मुदतीत या कार्यालयास संपर्क करावा.

## महिला उमेदवारांसाठी नवघरला राहण्याची सोय

लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या महिला उमेदवारांपैकी ज्या महिलांना शनिवारी राहण्याची सोय होऊ शकत नाही, अशा महिलांना मिरा भाईंदर मनपातर्फे स्व. प्रमोद महाजन सभागृह, स्व. मीनाताई ठाकरे सभागृह, आप्पासाहेब धर्माधिकारी सभागृह नवघर येथे विनामूल्य राहण्याची सोय करण्यात आली आहे.

Hello Vasai
Page No. 1 Apr 01, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

# वेश्या व्यवसायास प्रवृत्त करणाऱ्या दोघांना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : वेश्या व्यवसाय करण्यास प्रवृत्त करणाऱ्या दोन आरोपींना अटक करून दोन पीडित महिलांची सुटका करण्यात नालासोपाऱ्याच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पोलिसांना यश आले आहे.

बुधवारी अनैतिक मानवी वाहतूक कक्ष यांना वेश्या दलाल हरेश्वर केशव राऊत, गुडम्मा रातप्पा भांगी ऊर्फ राजश्री हे महिलांना पैशाचे आमिष दाखवतात व ग्राहकांना वेगवेगळ्या ठिकाणी बोलावून महिला पुरवितात अशी माहिती मिळाली होती. त्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतूक कक्षाचे पोलिस निरीक्षक संतोष चौधरी यांनी पोलिस कर्मचारी, बोगस गिऱ्हाईक यांनी तुंगारेश्वर फाटा येथील हॉटेल रुद्र शेल्टर येथे छापा टाकला. या दोन आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून एकूण १ लाख ९ हजार ७३० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करून दोन महिलांची सुटका केली आहे. तिसऱ्या पुरुष दलालाचा पोलिस शोध घेत आहेत. पेल्हार पोलिस ठाण्यात गुरुवारी गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Apr 01, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

# कमी मनुष्यबळात उत्कृष्ट कामगिरी

वसई - वसई वाहतूक शाखेची हद्द मोठी असली तरी त्यांच्याकडे पुरेसे मनुष्यबळ नाही, मात्र तरी देखील वसई वाहतूक शाखा कमी मनुष्यबळात उत्कृष्ट कामगिरी करत आहे. त्यांच्याकडे सध्या असणाऱ्या ३० ते ३५ टक्के मनुष्यबळात ते शहरात वाहतूक व्यवस्था सांभाळत असून, वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होऊ नये याचा प्रयत्न करत असल्याचे वसई वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक इंगोले यांनी सांगितले आहे.

वसई वाहतूक शाखेच्या अंतर्गत नायगाव पूर्व-पश्चिम, हायवे परिसर, वालीव, सातीवली, रेंज ऑफिस, वसई पूर्व-पश्चिम, भोईदापाडा अशी हद्द आहे. वालीव व रेंज ऑफिस, सातीवली या भागात रस्ते लहान असून, सतत खोदकाम, रस्ते दुरुस्ती व इतर कारणांमुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असते. त्यामुळे त्याठिकाणी दररोज २ ते ३ कर्मचारी उपलब्ध करण्यात येत असून, वाहतूक कोंडीचा प्रयत्न सोडवला जात आहे. त्याच बरोबर नायगाव स्टेशन परिसर, रेल्वे फाटक, हायवे याठिकाणी देखील वाहतूक कर्मचारी उपलब्ध करण्यात आले आहेत. वेळोवेळी उपलब्ध असणाऱ्या मनुष्यबळातच वाहतूक नियम तोडणाऱ्यांवर केसेस/कारवाई करणे, वाहतूक नियमांची जनजागृती करणे, स्पेशल ड्राईव्ह घेणे सुरू असते.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत एकूण १७ पोलीस ठाणी असून, आयुक्तालयाची स्थापना होऊन दोन वर्षे पूर्ण झाली आहेत.

आयुक्तालयात अद्याप ३४ टक्के मुष्यबळाची कमतरता भासत आहे. सध्या सुरू असणाऱ्या २०२१ च्या पोलीस भरतीनंतर नक्कीच काही टक्के मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. मनुष्यबळाची संख्या वाढल्याने मोठ्या प्रमाणात कारवाई करता येईल, असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक इंगोले यांनी सांगितले आहे.

Scanned with CamScanner

# अवैध अग्निशस्त्राबाबत गुन्हे दाखल

भाईंदर - मीरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयाच्या हद्दीत अवैध अग्निशस्त्र बाळगणाऱ्या व त्याची विक्री करण्याकरिता आलेल्यावर गेल्या तीन महिन्यांत ५ गुन्हे दाखल असून, ७ जणांना अटक करण्यात आली असून शिक्षा देखील झाली आहे.

आयुक्तालयाच्या हद्दीत सर्व पोलीस ठाणे कार्यक्षेत्रामध्ये २०१९ साली १६ गुन्हे दाखल असून, एकूण ३२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून देशी कट्टे ११ नग, पिस्तूल ७, बोअर पिस्तूल १, काडतुस ४१ असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. २०२० साली ३ गुन्हे दाखल असून ४ आरोपींना अटक करून त्यांच्या जवळून गावठी कट्टे २, बनावट ९ एम एम पिस्तूल-१ असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. २०२१ या सालात १५ गुन्हे दाखल असून ३२ आरोपींना अटक करून त्यांच्या जवळून गावठी कट्टे १५, पिस्तूल १, बारा बोअर १, काडतुस २५ असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. २०२२ मध्ये १ गुन्हा दाखल असून २४५ काडतुस जमा करण्यात आलेली आहेत. १ जानेवारी २०२३ ते ३० मार्च २०२३ पर्यंत एकूण ५ गुन्हे दाखल असून ७ आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून गावठी पिस्तूल, गावठी कट्टा, देशी पिस्तूल, पिस्तूल व १० जीवंत काडतुस जमा करण्यात आली आहेत. आयुक्तालयाच्या हद्दीत सर्व पोलीस ठाणे कार्यक्षेत्रामध्ये शांतता, कायदा सुव्यव्यस्था अबाधित राहावी, नागरिकांचे जीवित व वित्त सुरक्षित राहण्याची, तसेच समाजकंटक व गुंड प्रवृत्तीचे लोक यांच्या वर प्रतिबंधक कारवाई करणे सोईसकर व्हावे याकरिता महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३७ चे पोटकलम (१) व (३) अनवये मनाई आदेश लागू केले आहेत. यात कोणाच्या शरीरास ईजा होईल अशी कोणतीही शस्त्रे बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. मनाई आदेशाचा भंग करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे.

Scanned with CamScanner